# कोव्हिडचा असंघटीत कामगारावर झालेला परिणाम

**डॉ. योगेश एस. मुनेश्वर**
सहायक प्राध्यापक
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय,वर्धा
मोबाईल नं. – ९३७०५९३७६८
Email - yogeshmuneshwar70@gmail.com

---

**प्रस्तावना :—**

साल २०१९ च्या अखेरीस कोरोना व्हायरसने संपूर्ण जगभर थैमान घातले. अत्यंत संसर्गजन्य अशा या व्हायरसमुळे संपूर्ण जगातील यंत्रणा विस्कळीत झाली. भारतामध्ये कोरोनामुळे २२ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लॉक डाउन करण्यात आले. कधी न होणारे परिणाम या काळात पाहायला मिळाले. संपूर्ण जग हे थांबून गेले. याचा दुरगामी परिणाम मानवी जीवनावर झालेला दिसून आला. कोरोना व्हायरसने सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि इतर विविध क्षेत्रावर आपले पडसाद सोडला. इतर परिणाम म्हणून विविध क्षेत्रातील संघटित व असंघटित कामगारावर झाला झालेला दिसून येतो. परंतु असंघटित क्षेत्रातील कामगारावर परिणाम अधिक तीव्र स्वरूपावर झालेला दिसून आलेला आहे.

**उद्देश** :— १. असंघटीत क्षेत्रातील कामगारावर कोरोना चा झालेल्या परीणामाचा अभ्यास करणे.

२. कोरोना पुर्व व कोरोना नंतरच्या स्थितीची माहीती घेणे.

**तथ्य संकलन** :—

तथ्य संकलनाकरीता दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्यात आला. यामध्ये पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादी चा वापर करण्यात आला. राष्ट्रीय श्रम आयोगाने (१९६६—६९) 'असंघटित कामगार' ही संकल्पन स्पष्ट करतांना म्हटले आहे की, ज्यांना रोजगाराचे तात्पुरते स्वरूप, अज्ञान आणि निरक्षरता, व्यवसाय किंवा कामाचे विस्कळीत व लहान स्वरूप, कामाच्या स्वरूपामुळे मालकवर्गाकडे एकवटलेल्या शक्ती अशा सारख्या समस्यामुळे सामुदायिक उद्दीष्टये प्राप्त करण्यात अडचणी येतात. व ते संघटीत होवू शकत नाही, अशा कामगारांचा उल्लेख असंघटित कामगार म्हणून करता येईल.

**असंघटित कामगारांचे वर्गीकरण:—**

**व्यवसायानुसार :—** अल्पभूधारक शेतकरी, भुमिहीन शेतमजुर, मासेमारी करणारे, जनावरांचे संगोपन करणारे, विडी व्यवसायातील कामगार, बांधकामावर काम करणारे, जनावरांच्या चामडयाचे काम करणारे

Research Hub International Journal

विणकाम करणारे, कारागीर, विटा व दगडखाणीत काम करणारे लाकडे कापण्याच्या मिलमध्ये काम करणारे इ.

**रोजगाराच्या स्वरूपानुसार:—** बांधील शेतकामगार, वेठबिगार स्थलांतरीत कामगार, कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाची कामे करणारे मजुर इ.

**विशेष आपत्तीग्रस्त स्वरूपाचे कामगार :—** ताडी गोळा करणारे, सफाई कामगार, ओझी वाहणारे, हमाल जनावरांच्या गाडया हाकणारे इ.

**सेवा प्रकारातील कामगार:—** घरकामगार करणारे, नाभिक, भाज्या व फळविक्रेते, वर्तमानपत्र विक्रेते इ.

**लॉकडाउनपुर्व आणि नंतरच्या क्षेत्रातील अनौपचारिक कामगारांच्या रोजगाराची स्थिती (टक्केवारी मध्ये)**

| क्षेत्र | लॉकडाउन पुर्व | | | लॉकडाउन नंतर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बेरोजगार | काम शोधनारे | कार्यरत | बेरोजगार | काम शोधनारे | कार्यरत |
| कृषी | ६.१४ | १०.७५ | ८३.०८ | ६९.९२ | २०.४३ | ९.६५ |
| बाधंकाम | ४.५५ | ७.६९ | ८७.७६ | ८३.८५ | १०.८४ | ५.३१ |
| उत्पादन | २.२२ | ५.१२ | ९२.६६ | ७९.९६ | १३.०७ | ९.९७ |
| सेवा | २.७२ | ७.४२ | ८९.८६ | ७६.३२ | १४.२ | ९.४७ |

Source:Action Aid India2020

लॉकडाउनपुर्व व लॉकडाउन नंतर असंघटीत क्षेत्रातील कामागाराच्या स्थितीमध्ये मोठयाप्रमाणात तफावत दिसुन येते. कृषी क्षेत्रामध्ये लॉकडाउन पुर्व बेरोजगार हे ६.१४ टक्के होते तर लॉकडाउन नंतर कृषी क्षेत्रामध्ये बेरोजगारीचे ६९.९२ टक्के झाले. बांधकाम क्षेत्रामध्ये लॉकडाउन पुर्व बेरोजगार हे ४.५५ टक्के होते तर लॉकडाउन नंतर बांधकाम क्षेत्रामध्ये बेरोजगारीचे ८३.८५ टक्के झाले. सेवा क्षेत्रामध्ये लॉकडाउन पुर्व बेरोजगार हे २.७२ टक्के होते तर लॉकडाउन नंतर सेवा क्षेत्रामध्ये बेरोजगारीचे ७६.३२ टक्के झाले. यावरून असे दिसून येते की लॉकडाउन नंतर बांधकाम क्षेत्रामध्ये सर्वाधीक बेरोजगारीचे प्रमाण वाढले.

ग्रामीण भागामध्ये शेतीवर काम करणारे, मोलमजुरी करणारे कामगार, गवंडी काम करणारे कामगार यांना कोरोना कालखंडामध्ये अनेक संकटातून समोर जावे लागले कारण एका गावावरून दुसऱ्या गावाला कोणी बोलवत नव्हतं तसेच ते गावाबाहेर जाऊ शकत नव्हते. लॉकडाऊनच्या काळात गावातील सर्व सीमा ह्या गोठवण्यात आल्या होत्या. तसेच लोकांना येणे जाण्याकरता बंदी घालण्यात आली होती. जे लोक इकडे तिकडे जाण्यास सरसावत होते त्यांना बंदी आणण्यात आली ठिकठिकाणी त्यांना पोलीस अडवत होते. अशा कारणामुळे ग्रामीण भागातील शेतीवर काम करणारे, मोलमजुरी करणारे कामगारांना अनेक दिवस घरी बसावे लागले. पर्यायाने त्यांच्यावर उपासमारीचे वेळ आली. त्यांच्या उत्पन्नाचे सर्व श्रोत बंद झाले. त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी, शेतीसाठी बँके कडून व इतर ठिकाणाहून घेतलेले कर्ज

Research Hub International Journal

याचे डोंगर उभे झाले. या सर्व कारणामुळे ते चिंताग्रस्त झाले त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर दिसून आला.

ज्या भागात नदी किंवा समुद्रकिनारा आहेत त्या ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणून मासेमारी हा आहे. परंतु संपूर्ण व्यापारी प्रतिष्ठान व मच्छी मार्केट किंवा इतर सर्व प्रकारचे मार्केट बंद असल्यामुळे व लॉकडाऊन लागल्यामुळे कोणीही खरेदी विक्रीसाठी बाहेर जात नव्हते. परिणामी माशाची विक्री, पर्यटन क्षेत्र या सर्वावर बंदी असल्यामुळे मासेमारी व्यवसाय करणाऱ्या सर्व लोकांना आर्थिक समस्या भेडसावू लागल्या. लॉकडाउनमुळे वाहतूक व बाजारपेठ बंद असल्यामुळे शेती उत्पादनावर अवलंब असणारे कामगार यांच्यावर मोठा परिणाम झाला. भाजीपाला विक्री करणारे कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. परंतु बाजारपेठ पूर्ण बंद असल्यामुळे ते कुठल्या प्रकारच्या विक्री करू शकले नाही त्यामुळे देशांतर्गत व असंघटित क्षेत्रातील काम कार्यरत असलेल्या कामगारावर मोठ्या प्रमाणात संकट निर्माण झाले.

शहरी क्षेत्रामध्ये बांधकाम व्यवसाय, सफाई कामगार, ओझे उचलनारे हमाल, फळे भाजी विक्रेते, वर्तमानपत्र विक्रेते, विणकाम करणारे, हॉटेल मध्ये काम करणारे, व इतर ठिकाणी काम करणारे कामगार मोठ्या प्रमाणात दिसून येतात.कोरोनाचा संसर्ग शहरी भागातील अत्यंत तीव्रतेने असल्यामुळे शहरी भागातील क्षेत्रामध्ये लॉकडाऊनच्या कडेकोटपणे पालन करण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की कोणीलाही कुठेही जाण्यासाठी मुभा नव्हती. त्यामुळे ह्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या असंघटित कामगारांना आपल्या घरीच राहवे लागले.परिणामी त्यांना कुठल्याही प्रकारचे काम मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक समस्या निर्माण झाली. शासनाच्या व स्वयंसेवी संस्थाच्या कार्यामुळे काही प्रमाणात त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न जरी सुटला असला तरी पण त्यांच्यावर विविध स्वरूपाचे असणारे कर्जामुळे त्यांच्यावर आर्थिक व मानसिक परिणाम झालेला दिसून आला.

**समारोप:–**

कोरोना कालखंडामध्ये शासनाने लावलेल्या लॉकडाउन मुळे संपूर्ण जनजिवन अस्ताव्यस्त झाले त्यामुळे संपुर्ण क्षेत्रातील कामे बंद झालेत. भविष्य हे अंधकारमय दिसत असल्यामुळे तसेच भविष्यात उपासमारीची वेळ येउ शकते या मुळे असंघटीत क्षेत्रातील कामगार हे आपल्या मुळ गावी परत गेले. कोव्हिड मधील भयावह परीस्थिती पाहता ते कोरोना नंतर आपल्या कामावर पुर्ववत होणार याबाबत शंका निर्माण होत आहे.

**संदर्भ :–**


- बोधनकर सुधिर (२००६); “सामाजिक संशोधन पध्दती”, श्री साईनाथ प्रकाशन : नागपूर
- भांडारकर पु.ल. (१९६७); “सामाजिक संशोधन पध्दती”, श्री साईनाथ प्रकाशन : नागपूर
- गुप्ते वि.प. (१९९५); “कामगार चळवळीची वाटचाल आणि पुढील आव्हाने”, केंद्रिय कामगार शिक्षण मंडळ : नागपूर
- https://sprf.in/wp-content/uploads/2021/02/Indias-Informal-Workers-Under-the-Lockdown-SPRF-2021.pdf